नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - २४९ Issue - 249 | वार शनिवार दि. २५ जानेवारी २०२५ Blow- Saturday Date 25 January 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# वक्फ बोर्ड विधेयकाच्या संयुक्त संसदीय समितीमधून १० खासदारांचे निलंबन



## पहिल्याच दिवशी खासदारांमध्ये गदारोळ; यंदाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात सदर विधेयक मांडले जाण्याची शक्यता

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : वादग्रस्त वक्फ विधेयकावरील संयुक्त संसदीय समितीचा (जेपीसी) ५०० पानी अहवाल तयार झाला आहे. या अहवालावर शुक्रवार आणि शनिवारी अशी दोन दिवस बैठक होऊन चर्चा होणार होती. मात्र आज आज बैठकीच्या पहिल्या दिवशीच खासदारांमध्ये गदारोळ झाला. ज्यामुळे आता विरोधी पक्षाच्या १० खासदारांना समितीमधून निलंबित करण्यात आले आहे. निलंबित करण्यात आलेल्या खासदारांमध्ये शिवसेना (ठाकरे) पक्षाचे अरविंद सावंत, असुदद्दीन ओवेसी यांचा समावेश आहे. या बैठकीत अहवालावर चर्चा होऊन ते विधि मंत्रालयाकडे दिले जाणार होते. यंदाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात सदर विधेयक मांडले जाण्याची शक्यता आहे.

भाजपाचे खासदार जगदंबिका पाल हे या संयुक्त संसदीय समितीचे अध्यक्ष आहेत. ते म्हणाले की, आज आम्ही जम्मू-काश्मीरमधील शिष्टमंडळ मीरवाईज उमर फारूक यांच्या शिष्टमंडळाला त्यांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी वेळ दिला होता. मात्र संसदेत विधेयकाच्या चर्चेत सहभागी न होणारे असदुद्दीन ओवेसी आज मात्र चर्चेत सहभागी झाले. तसेच तृणमूल काँग्रेसचे खासदार कल्याण बॅनर्जी यांनी माझ्याशी असभ्य वर्तन करत असंसदीय भाषा वापरली. मी त्यांना शांत करण्याचे आवाहन करत होतो. पण ते ऐकायला तयार नव्हते. अखेर भाजपा खासदार निशिकांत दुबे यांनी खासदारांचे निलंबन करण्याचा प्रस्ताव दिला.

निलंबित करणाऱ्यात आलेल्या खासदारांमध्ये कल्याण बॅनर्जी, मोहम्मद जावेद, ए. राजा, असदुद्दीन ओवेसी, नसीर हुसेन, मोहिबुल्ला, मोहम्मद अब्दुल्ला, अरविंद सावंत, नदीम-उल हक आणि इम्रान मसूद यांचा समावेश आहे.

आजच्या बैठकीची सुरुवात गोंधळाने झाली. विरोधी पक्षातील खासदारांनी आरोप केला की, त्यांना विधेयकात जे बदल सुचविले आहेत, त्या नव्या मसुद्याचा अभ्यास करण्यासाठी पुरेसा वेळ दिलेला नाही. काँग्रेसचे खासदार इम्रान मसूद यांचे संसदीय समितीमधून निलंबन झाल्यानंतर त्यांनी म्हटले की, सरकारला वक्फच्या मालमत्तांवर नियंत्रण हवे आहे.

लोकसभेत सादर झालेल्या वक्फ विधेयकामध्ये ४४ दुरुस्त्या सुचवण्यात आल्या आहेत. या प्रत्येक दुरुस्तीवर 'जेपीसी'च्या दोन दिवसांच्या बैठकीमध्ये सविस्तर चर्चा करणे अपेक्षित होते. राज्या-राज्यांतील वक्फ मंडळांकडे १९५०मध्ये ३५ हजार जमिनी होत्या, गेल्या ७५ वर्षांमध्ये त्यांची संख्या वाढून तब्बल १० लाख झाली आहे. त्यातील अनेक जमिनी वक्फ मंडळाने बळकावल्याचा दावा 'जेपीसी'तील सत्ताधारी भाजपच्या सदस्यांनी केला आहे. या जमिनींच्या मालकीहक्काबाबत पूर्वलक्ष्यी प्रभावाने फेरआढावा घेतला पाहिजे, अशी मागणी 'जेपीसी'मध्ये करण्यात आली.

'जेपीसी'च्या आतापर्यंत झालेल्या ३४ बैठकांपैकी बहुतांश वादळी ठरल्या होत्या. तृणमूल काँग्रेसचे खासदार कल्याण बॅनर्जी यांची बाटली फोडण्यापर्यंत मजल गेली होती. काँग्रेस, द्रमुक, शिवसेना-ठाकरे गट आदी विरोधी सदस्यांनी विधेयकातील दुरुस्त्यांना कडाडून विरोध केला होता. त्याची पुनरावृत्ती आजच्या बैठकीतही पाहायला मिळाली.

## थोडक्यात...

### भंडारा स्फोटात आठ कामगारांचा मृत्यू, अनेक जण जखमी

नागपूर: भंडारा जिल्ह्यातील जवाहर नगर आयुध निर्माणीतील स्फोटात आठ कामगार मृत्यू झाल्याची माहिती केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी नागपूरमध्ये दिली. मात्र दुपारी चार वाजता भंडारा जिल्हा प्रशासनाने चार मृतकांची नावे जाहीर केली आहेत.

भंडा-याजवळील जवाहर नगर आयुध निर्माणीत सकाळी १० वा स्फोट झाला. तेंव्हापासून या दुर्घटनेत किती कामगार दगावले याची अधिकृत माहिती प्रशासनाकडून जाहीर केली नव्हती. त्यामुळे वेगळे आकडे सांगितले जात होते. नागपूरमध्ये केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी एका कार्यक्रमात भंडारा प्रशासनाशी संपर्क साधून दुर्घटनेत आठ कामगारांचा मृत्यू झाल्याचे सांगितले होते. त्यानंतर दुपारी चारच्या सुमारास भंडारा जिल्हा प्रशासनाने चार मृत कामगारांची तसेच जखमींची यादी जाहीर केली.

मृत कामगार : १)चंद्रशेखर गोस्वामी (५९ वर्षे ) २) मनोज मेश्राम (५५ वर्षे ) ३)अजय नागदेवे (५१ वर्षे ) ४)अंकित बारई (२० वर्षे )

## दोन लाख बांगलादेशींना जन्म दाखल्याचे वाटप, किरीट सोमय्या यांचा गंभीर आरोप



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : बॉलिवूड अभिनेता सैफ अली खानवर हल्ला करणारा आरोप बांगलादेशी असल्याचा आरोप झाल्यानंतर आता महाराष्ट्रात किती बांगलादेशी घुसखोर आहेत, याची चर्चा सुरू झाली. भाजपा नेते किरीट सोमय्या हे या प्रकरणी पाठपुरावा करत असून ते विविध जिल्ह्यांचा दौरा करत आहेत. राज्यात दोन लाख बांगलादेशी रोहिंग्या मुस्लीमांना बनावट जन्म प्रमाणपत्र देण्यात आले आहेत. मालेगावपासून याची सुरुवात झाली असल्याचा आरोप सोमय्या यांनी केला. मालेगावमधील दोन राजकीय नेते, दहशतवादी संघटनेचे नेते आणि सीमेवरील दोन एजंट यात सामील आहेत. या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी राज्य सरकारने एटीएसची स्थापना केली आहे. जे बांगलादेशी रोहिंग्या खरी प्रमाणपत्रे सादर करू शकणार नाहीत, त्यांना पुन्हा बांगलादेशमध्ये पाठविले जाणार आहे.

बांगलादेशी रोहिंग्यांना बनावट जन्म प्रमाणपत्र दिल्याबद्दल नुकतेच मालेगावचे तहसीलदार आणि नायब तहसीलदार यांना निलंबित करण्यात आले आहे. मालेगावप्रमाणेच इतर ठिकाणीही आता कारवाई होणार असून काही अधिकाऱ्यांचे निलंबन होणार असल्याचे सुतोवाच सोमय्या यांनी केले आहे. एका बाजूला अधिकाऱ्यांवर कारवाई दुसऱ्या बाजूला या बांगलादेशींना परत पाठवण्याचे काम केले जाणार आहे. तसेच यापुढे जन्म प्रमाणपत्र देत असताना व्यवस्थित लक्ष देण्याची आवश्यकता असल्याचेही ते म्हणाले. किरीट सोमय्या यांनी जिल्ह्यानुसार जन्म प्रमाणपत्र वाटल्याची आकडेवारी दिली. ते म्हणाले, यवतमाळला १३,५००, अमरावती आणि अकोलामध्ये १५,००० लोकांना प्रमाणपत्र दिले गेले आहे. तर अकोला शहरात साडेचार हजार लोकांना प्रमाणपत्र मिळाले आहे. अमरावतीमधील गाव अंजनगाव सुर्जीमध्ये २२ हजार मुस्लिमांची संख्या असून त्यात १,४८० बांगलादेशी मुस्लीम आहेत. महाराष्ट्रात महाविकास आघाडी सरकार असताना बांगलादेशाच्या सीमेवरील एजंट यांनी मोठे षडयंत्र आखले. लोकसभेत यांचे अधिक खासदार निवडून आल्यानंतर आता त्यांचे सरकार येणार या विचाराने त्या चार-पाच महिन्याच्या काळात महाराष्ट्रात दोन लाख बांगलादेशी रोहिंग्यानी अर्ज केला होता. यापैकी १ लाख ७ हजारांना जन्म प्रमाणपत्र देण्यात आले, असा आरोप किरीट सोमय्या यांनी केला.

## पवार साहेब महाराष्ट्राला हिशोब द्या, तुम्ही सहकार क्षेत्रासाठी काय केले,



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नाशिक : केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शाह आज महाराष्ट्र दौऱ्यावर आहेत. नाशिकच्या मालेगाव तालुक्यातील अजंग गावी ते वेंकटेश्वरा कोऑपरेटिव्ह पॉवर अँड अॅग्रो प्रोसेसिंग लिमिटेडने आयोजित केलेल्या कार्यक्रमाला ते उपस्थित राहिले आहेत. यावेळी त्यांनी संस्थेच्या काजू प्रक्रिया युनिट आणि माती तपासणी प्रयोगशाळेचे उद्घाटन केले. या कार्यक्रमात बोलताना अमित शाह यांनी सहकार क्षेत्रावरून माजी केंद्रीय कृषी मंत्री शरद पवार यांना लक्ष्य केले आहे. यावेळी त्यांनी, शरद पवार दहा वर्षे केंद्रीय कृषी मंत्री असताना त्यांनी महाराष्ट्राच्या सहकार क्षेत्रासाठी काय केले? असा थेट सवाल केला आहे.

यावेळी सहकार क्षेत्राबाबत बोलताना अमित शाह म्हणाले, गेल्या अनेक वर्षांपासून देशभरातील सहकार क्षेत्रातील लोक, सहकार मंत्रालय स्थापन करण्याची मागणी करायचे, त्यांचे कोणीही ऐकत नव्हते. पण, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतर सहकार मंत्रालयाची स्थापना

### अमित शहा यांचा थेट सवाल

केली आहे. यामुळे देशातील शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होणार आहे. इथे आत्मनिर्भरतेची सर्वात सुंदर कुठली व्याख्या असेल तर ती सहकार आहे. अमित शाह यांनी पुढे बोलताना माजी केंद्रीय कृषी मंत्री शरद पवार यांनाही लक्ष्य केले. ते म्हणाले, गेल्या अनेक वर्षांपासून महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांच्या करावरून वाद होत होते. पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वाखाली भाजपा सरकारने हा प्रश्न सोडवला. आज मी या व्यासपीठावरून पवार साहेबांना विचारू ईच्छितो की, तुम्ही दहा वर्षे देशाचे कृषी मंत्री होता. त्यावेळी सहकार क्षेत्र कृषी मंत्रालयांतर्गत होते. तेव्हा तुम्हा सहकार क्षेत्रासाठी काय केले? साखर कारखान्यांसाठी काय केले आणि शेतकऱ्यांसाठी काय केले? याचा हिशोब तुम्ह महाराष्ट्राला द्यायला हवा. पवार साहेब नेता होण्यासाठी फक्त मार्केटींग पुरेसे नाही. त्यासाठी तळागात काम कारावे लागते. मी इथे आज राजकारण करण्यासाठी आलो नाही. पण, सहाकार मंत्रालयाची स्थापना आणि साखर कारखान्यांच्या कराच्या प्रश्नांसारख्या समस्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीच सोडवल्या आहेत. दरम्यान मालेगावातील या कार्यक्रमासाठी अमित शाह यांच्यासह केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहळ, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि राष्ट्रवादीचे (अजित पवार) माजी मंत्री छगन भुजबळ उपस्थित होते.




### रिक्षा आणि टॅक्सीचा प्रवासही महागणार | परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची माहिती

# एसटी बसच्या तिकीट दरात मोठी वाढ



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : एसटी महामंडळाने गेल्या तीन वर्षात एसटीच्या तिकीट दरात कोणतीही वाढ केली नव्हती. मात्र, आता एसटीचा प्रवास महागला आहे. एसटीच्या तिकीट दरात वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. एसटी महामंडळाने भाडेवाढीचा प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठवला आल्याचं काही दिवसांपूर्वी सांगितलं जात होतं. यानंतर अखेर आता एसटीच्या तिकीट दरात वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, यासंदर्भातील माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली आहे. याबरोबरच रिक्षा आणि टॅक्सीचा प्रवासही महागणार आहे. १ फेब्रुवारीपासून रिक्षा आणि टॅक्सीची देखील भाडेवाढ होणार असल्याची माहिती प्रताप सरनाईक यांनी दिली आहे.

आज मी राज्याच्या प्रधान सचिवांबरोबर चर्चा केली. तेव्हा त्यांनी सांगितलं की गुरुवारी एक महत्वाची बैठक झाली. त्या बैठकीत एसटीच्या भाडेवाढीबाबत निर्णय घेण्यात आला आहे. कारण गेल्या अनेक वर्षांपासून एसटीची भाडेवाढ करण्यात आली नव्हती. आता एसटीची १४.९७ टक्के भाडेवाढ करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. तसेच एसटीची ही भाडेवाढ आजपासून लागू करण्यात येणार आहे, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

१ फेब्रुवारीपासून रिक्षा आणि टॅक्सीची देखील भाडेवाढ होणार आहे अशी माहिती मला सांगण्यात आली आहे. मात्र, यासंदर्भातील फाईल माझ्यापर्यंत आलेली नाही. पण भाडेवाढीबाबतची फाईल माझ्यापर्यंत येईल. खरं तर एसटीची भाडेवाढ गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित होती. एसटीच्या तिकीट दरात दरवर्षी वाढ करणं गरजेचं असतं. कारण प्रवाशांना सुविधा देत असताना एसटी महामंडळाला खर्चही येतो. यामध्ये डिझेलचा दर दिवसेंदिवस वाढत चालला आहे. तसेच कर्मचाऱ्यांचे पगार वाढले आहेत. यातच एसटी महामंडळाची परिस्थिती आपण पाहिली तर दरदिवशी सुमारे ३ कोटींचा आर्थिक तोटा सहन करावा लागत आहे. अशा परिस्थितीत भाडेवाढ करण्याशिवाय दुसरा पर्याय नाही, असं परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी माध्यमांशी बोलताना म्हटलं आहे.

एसटीच्या भाडेवाढीसंदर्भातील परिपत्रक आज निघेल. तसचे एसटीची भाडेवाढ ही १४.९७ टक्के करण्यात येणार आहे. तसेच राज्य सरकारने एसटी प्रवासात ज्या सवलती दिलेल्या आहेत त्या सवलती बंद करण्यात येणार नाहीत. त्या सवलती सुरुच राहतील. तसेच महिलांना एसटी तिकीटातून ५० टक्क्यांची सूट देखील सुरु राहणार आहेत, असंही मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितलं.

रिक्षा आणि टॅक्सीची भाडेवाढ ही ३ रुपये प्रति किलोमीटर होणार आहे. तसेच रिक्षा आणि टॅक्सीची ही भाडेवाढ १ फेब्रुवारीपासून लागू असणार आहे, असंही मंत्री प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट केलं आहे.

## संपादकीय....

### बनावटीचा सुळसुळाट

बांगलादेशी रोहिंग्यांना बनावट जन्म प्रमाणपत्र दिल्याबद्दल नुकतेच मालेगावचे तहसीलदार आणि नायब तहसीलदार यांना निलंबित करण्यात आले आहे. मालेगावप्रमाणेच इतर ठिकाणीही आता कारवाई होणार असून काही अधिकाऱ्यांचे निलंबन होणार असल्याचे सुतोवाच सोमय्या यांनी केले आहे. एका बाजूला अधिकाऱ्यांवर कारवाई दुसऱ्या बाजूला या बांगलादेशींना परत पाठवण्याचे काम केले जाणार आहे. तसेच यापुढे जन्म प्रमाणपत्र देत असताना व्यवस्थित लक्ष देण्याची आवश्यकता असल्याचेही ते म्हणाले. किरीट सोमय्या यांनी जिल्ह्यानुसार जन्म प्रमाणपत्र वाटल्याची आकडेवारी दिली. ते म्हणाले, यवतमाळला १३,५००, अमरावती आणि अकोलामध्ये १५,००० लोकांना प्रमाणपत्र दिले गेले आहे. तर अकोला शहरात साडेचार हजार लोकांना प्रमाणपत्र मिळाले आहे. अमरावतीमधील गाव अंजनगाव सुर्जीमध्ये २२ हजार मुस्लिमांची संख्या असून त्यात १,४८० बांगलादेशी मुस्लीम आहेत. महाराष्ट्रात महाविकास आघाडी सरकार असताना बांगलादेशाच्या सीमेवरील एजंट यांनी मोठे षडयंत्र आखले. लोकसभेत यांचे अधिक खासदार निवडून आल्यानंतर आता त्यांचे सरकार येणार या विचाराने त्या चार-पाच महिन्याच्या काळात महाराष्ट्रात दोन लाख बांगलादेशी रोहिंग्यानी अर्ज केला होता. यापैकी १ लाख ७ हजारांना जन्म प्रमाणपत्र देण्यात आले, असा आरोप किरीट सोमय्या यांनी केला.बॉलिवूड अभिनेता सैफ अली खानवर हल्ला करणारा आरोप बांगलादेशी असल्याचा आरोप झाल्यानंतर आता महाराष्ट्रात किती बांगलादेशी घुसखोर आहेत, याची चर्चा सुरू झाली. भाजपा नेते किरीट सोमय्या हे या प्रकरणी पाठपुरावा करत असून ते विविध जिल्ह्यांचा दौरा करत आहेत. राज्यात दोन लाख बांगलादेशी रोहिंग्या मुस्लीमांना बनावट जन्म प्रमाणपत्र देण्यात आले आहेत. मालेगावपासून याची सुरुवात झाली असल्याचा आरोप सोमय्या यांनी केला. मालेगावमधील दोन राजकीय नेते, दहशतवादी संघटनेचे नेते आणि सीमेवरील दोन एजंट यात सामील आहेत. या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी राज्य सरकारने एटीएसची स्थापना केली आहे. जे बांगलादेशी रोहिंग्या खरी प्रमाणपत्रे सादर करू शकणार नाहीत, त्यांना पुन्हा बांगलादेशमध्ये पाठविले जाणार आहे.

# देशाभिमान बाळगा पण संविधान ही वाचवा !!

भारताला या ब्रिटीश राजवटीपासून १५ ऑगस्ट १९४७ ला स्वातंत्र्य मिळाले. या मागे भारताचा स्वातंत्र्य लढा आणि त्यातील महात्मा गांधी यांच्या अहिंसा पद्धतीचा मोठा सहभागआहे. तेव्हा स्वतंत्र भारताला स्वतःचे संविधान नव्हते. भारताचे मात्र कायदे हे भारतीय राज्य शासनाच्या १९३५ सालच्या कायद्यावर (कलमावर) आधारित होते.

२९ ऑगस्ट १९४७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली स्वतंत्र भारताचे संविधान तयार करण्यासाठी मसूदा समिती स्थापना केली गेली. या समितीने बाबासाहेबांना कसले ही सहकार्य केले नाही, उलट बाबासाहेबांनी संविधानाचा मसुदा तयार करून तो सभेपुढे ४ नोव्हेंबर १९४७ रोजी सादर केला. या सभेने सार्वजनिक चर्चेसाठी सभागृहात हा प्रस्ताव १६६ दिवसांसाठी खुला केला. २ वर्ष, ११ महिने आणि १७ दिवसाच्या कालावधी नंतर हा मसुदा अंतिम केला. एकटया बाबासाहेब आंबेडकरांनी घटना तयार करतांना त्यांनी कल्पनातीत परिश्रम घेतले व जी असामान्य बुध्दीमत्ता प्रगट केली ती खरोखरच संस्मरणीयच म्हणावी लागेल, यात शंका नाहीच. बाबासाहेबांमुळेच भारतीय राज्यघटना जगमान्य झाली. बरेचसे विचार विमर्श आणि सुधारणा केल्यानंतर समितीच्या ३०८ सदस्यांनी दोन हस्तलिखित प्रती (हिंदी आणि इंग्रजी) २४ जानेवारी १९५० रोजी स्वाक्षरांकित केल्या. दोन दिवसानंतर हे भारताचे संविधान संपूर्ण राष्ट्रासाठी समर्पित करुन लागू करण्यात आले. भारताच्या संविधानाच्या निमित्ताने भारताचा प्रजासत्ताक दिन हा साजरा करण्यात येऊ लागला.

दरवर्षी प्रजासत्ताक दिन राष्ट्रीय दिन म्हणुन २६ जानेवारी ला साजरा केला जातो. २६ जानेवारी १९५० ला अंमलात आलेली स्वतंत्र सार्वभौम लोकशाही प्रजासत्ताक भारताची नवी राज्यघटना नव्याने स्वातंत्र्य मिळालेल्या भारतीय घटनेचे एक महान शिल्पकार म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या संविधानाचा भारत देशाने स्वीकार करून लोकशाहीतील एका नव्या पर्वाची सुरुवात केली होती. लोकशाही म्हणजे जनतेसाठी, जनतेचे व जनतेने चालविलेल्या राज्यांचे तत्व अंतर्भूत केले आहे. ती घटना जर दीर्घकाळपर्यंत टिकावी अशी आपणांस इच्छा असेल तर आपणापुढे जी संकटे वाढून ठेवलेली आहेत, ती समजून घेण्यास आपण विलंब लावता कामा नये. तसेच त्याचे निराकरण करण्यास असमर्थ राहता कामा नये. देशाची सेवा करण्याचा हाच मार्ग आहे असेही डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले.

२६ जानेवारी हा दिवस राज्यघटना अंमलात आणण्यासाठी निवडण्यात आला. या दिवशी देशभरात भारताच्या राष्ट्रध्वजाचे आरोहण होऊन त्याला वंदना दिली जाते. भारताचे राष्ट्रगीत म्हटले जाते आणि आदर व्यक्त केला जातो. हा दिवस आपल्या देशातील सुवर्ण दिन आहे. या दिवसाची प्राप्ती हजारो देशभक्तांच्या बलिदानातून झाली होती. या दिवशी शाळा महाविद्यालयांमध्ये भाषणाचे विविध देशभक्तीपर मनोरंजनाचे प्रेरणादायक असेकार्यक्रम आयोजित केले जातात.

महात्मा गांधींनी भगवान गौतम बुध्दाच्या तत्वज्ञानानुसार शांती व अहिंसेच्या मार्गाने लोकांना जागृत करुन देशात रक्तविहीन क्रांती केली, ही मोठी शक्ति गांधीजींच्या रुपात पाहायला मिळाली. गांधीजींच्या हाकेवर अनेक असाधारण लोक जमा झाले व त्या सगळयांच्या मदतीने स्वातंत्र्य लढा जिंकला. पं. जवाहरलाल नेहरु यांनी स्वातंत्र्य भारताला लोकशाहीमुल्ये रुजविण्यासाठी नवी दृष्टि दिली. देशाचा



**– प्रवीण बागडे, नागपूर**
भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९
ई–मेल: pravinbagde@gmail.com

आर्थिककणा मजबूत व्हावा यासाठी त्यांनी पंचवार्षीक योजनेला दिले, त्याची फळे आज आपण चाखत आहोत.

आधूनिक भारताच्या जडणघडणीत काँग्रेसपक्षाने महत्वपूर्ण भूमीका बजावली आहे. सतत धर्मनिरपेक्षतेची कास धरुन कार्य केले. गरीबांच्या हक्काच्या रक्षणासाठी पुढाकार घेणारा काँग्रेस हा एकमेव पक्षआहे. ब्रिटीशांच्या जुलमी जोखडातून देशवासीयांना सोडविण्याचे सामर्थ्य केवळ काँग्रेस पक्षातच होते. स्वातंत्र्यपूर्व काळात आणि नंतर दैदिप्यमान काम करणाऱ्या या पूर्वजांनी सोपविलेला वारसा जोपासने आणि देशाला जगात अत्युच्य शिखरावर पोहचविण्याची सामाजिक आर्थिक व खाजगी स्वातंत्र्य मिळवून देण्याचे महत्त कार्य काँग्रेस कडून घडले, देशातील प्रत्येक नागरिकाला याची जाण आहे.

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचा इतिहास केवळ आपल्यासाठीच नव्हे तर देशवासीयांसाठी प्रेरणादायी आहे. जगातील सर्वात मोठा लोकशाही पक्ष काँग्रेस असल्याबाबतचा कृतार्थ अभिमान आम्हाला आहे. धर्मनिरपेक्षता आणि स्वातंत्र्यता हे आमचे सुत्र राहिले आहे. त्यांच्या नेतृत्वात आम्ही जागतिक मंदीतही आर्थिक विकासाकडे मजल मारु शकलो हे काँग्रेसपक्षाच्या यशाचे गमक आहे. देशाला ब्रिटीशाच्या जुलमी विळख्यातून सोडविण्याची जबाबदारी आमच्यावर होती, ध्येयवेडे होऊनच आम्हाला ते साध्य करता आले.

जागतीक घडामोडीमध्ये याच काळात भारताच्या शब्दाला महत्व प्राप्त होऊ लागले. तद्नंतर दिवंगत प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांचे योगदान देशासाठी अनन्य साधारण महत्व होते. त्यांनी त्यांच्या काळात हरीतक्रांतीच्या माध्यमातून गरीबी हटाओ चा नारा देत जनसामान्याच्या आवाजाला हुंकार दिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मांडलेल्या आर्थिक धोरणानूसार २० कलमी कार्यक्रम राबवून या देशात खऱ्या अर्थाने लोकशाही प्रस्थापित केली. त्यानंतर दिवंगत प्रधानमंत्री राजीव गांधी यांनी पाहिलेले २१ व्या शतकाने विज्ञान आणि तंत्रज्ञानाने भारताचे स्वप्न साकार केले, याचे संपूर्ण श्रेय दिवंगत प्रधानमंत्री राजीव गांधी यांना जाते. भारतातील काना कोपऱ्यात केलेला प्रवास, त्या भागातील प्रश्न आणि प्रत्येक भारतीयास समजुन घेण्याची त्यांची तळमळ यातूनच त्यांनी देशातील तरुण–तरुणींना पूढे आणले, हे विसरता येणे शक्य नाही, यामुळे देश प्रगल्भ अवस्थेत आहे.

१५ जानेवारी १८४९ रोजी लेप्टनंट जनरल करिअप्पा हयांनी ब्रिटीश जनरल कडून कार्यभार स्वीकारला होता. हा दिवस देशभरात भारतीय सेना दिवस म्हणून साजरा केला जातो. देशाचा गौरव विशेष म्हणजे १५ जानेवारी २०२५ रोजी ७६ वर्ष पूर्ण झालीत. या ७६ वर्षाच्या इतिहासात भारतीय थलसेनेने असामान्य धैर्य, साहस, पराक्रम गाजवित भारत मातेच्या सीमेचे रक्षण केले. तसेच देशावर झालेल्या शत्रूंच्या आक्रमणा विरुध्द सडेतोड प्रतिउत्तर देवून शत्रूंना पायचित केले. भारतीय सेना जगात दुसरी मोठी सेना आणि चौथी शक्तीशाली सेना आहे. अशा या बलाढय, साहसी व पराक्रमी थलसेनेचा ७६ व्या वर्धापन दिनी भारतीय थलसेना दिवस म्हणुन देशभरात साजरा करण्यात आला.

माजी पंतप्रधान दिवं. डॉ. मनमोहनसिंग यांनी अत्यंत सौम्य आणि संयम ऋषीमुर्तीने सुरळीत शासन चालवतांना नक्षलवाद, आतंकवाद, भाषावाद, प्रांतवाद, जातीयवाद या सर्ववादांना समुळ नेस्तनाबूत करण्यासाठी त्यांनी उचललेली पाऊले, खरेच देशाभिमान वाटावा अशीच म्हणावी लागेल. केवळ देशातच नव्हे, तर विदेशातही आदराचे स्थान कमावलेले आहे. आज भारताने जागतिक पातळीवर वेगळीच उंची गाठली आहे. देशाला आज ७६ वर्षे पूर्ण झालीत, ही अत्यंत आनंदाची आणि अभिमानाची बाब आहे. प्रजासत्ताक दिनाच्या आजच्या शुभदिनी राष्ट्राची अस्मिता आणि ऐक्य टिकवून ठेवण्यासाठी आपण कटीबध्द होऊ या !

**कदम कदम बढाये जा, खुशी के गीत गाये जा**

**ये जिंदगी है कौम की, तू कौम पे लुटाये जा**

# बाल आनंद मेळाव्यातून विद्यार्थ्यांना कमवा व शिकातून व्यावहारीक ज्ञानाचे धडे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वाशिम : रहेमानिया उर्दू शाळा रिसोड येथे दि.२३/०१/२०२५ (गुरुवार) रोजी बाल आनंद मेळावा घेण्यात आला. या कार्क्रमाचा उद्धाटन (झडख) अब्दुल कदीर यांचे हस्ते करण्यात आला होता. व अब्दुल कदीर सर यांची रिसोड पोलीस स्टेशन येथे (ीळि) पदावर नियुक्ती झाल्याने त्यांना पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. आनंद मेळाव्यात एकूण २१ स्टॉल होते त्यात आपले पारंपारिक खाद्यपदार्थ आणले होते. या मेळाव्यात मुलांना व्यवहार ज्ञान, नफा–तोटा, फायदा– नुकसान व हिशोब ताळमेळ हे सर्व कौशल्य विद्यार्थ्यांना या मेळाव्यातून शिकण्यास मिळाले.व्यावहारिक ज्ञान महत्त्वाचे शालेय जीवनात शिक्षणासोबत विद्यार्थ्यांना व्यावहारिक ज्ञान देखील येणे गरजेचे आहे.आनंद नगरी मेळाव्यात विद्यार्थ्यांनी विविध स्टॉल लावून स्वतः बनवलेल्या पदार्थांची विक्री केली. त्यातून दोन पैसे मिळवले हे खरच कौतुकास्पद आहे. शाळेने राबविलेला हा उपक्रम त्यांना भविष्यात नेहमीच चालना देईल, अशी प्रतिक्रीया मुख्याध्यापक बिलाल अहमद खान सर यांनी दिली. या कार्यक्रमांमध्ये शाळेचे अध्यक्ष हाजी रफि अहमद सर, मुख्याध्यापक बिलाल अहमद खान सर, मुख्याध्यापक, तौफिक अहमद सर, रिसोड पोलीस स्टेशन चे (ीळि) सैय्यद हारून सर, (ीळि) अब्दुल कदीर सर, व शाळेचे शिक्षक उपस्थित होते.

**रहेमानिया उर्दू शाळेत आनंद मेळावा यशस्वी**









# श्रीमंत छत्रपती संभाजी महाराज यांच्या हस्ते प्रा. सोमनाथ माने राज्यस्तरीय महात्मा फुले व सावित्रीबाई फुले गुणवंत शिक्षक पुरस्काराने सन्मानित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे : इंदापूर येथील राजमाता अहिल्याबाई होळकर निवासी महाविद्यालय इंदापूर येथील प्राध्यापक सोमनाथ माने सर यांना नुकतेच पुणे येथे झालेल्या महात्मा ज्योतिराव फुले इतिहास अक्ॅडमी यांच्या वतीने राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला. सदर कार्यक्रमाची व राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार वितरण समारंभाची भूमिका ही डॉ. श्रीमंत कोकाटे सर यांनी संपूर्ण महाराष्ट्रभर राबवलेली आहे.

आपल्या देशात सार्वजनिक आणि मोफत शिक्षणाचा पाया घालणाऱ्या महात्मा फुले सावित्रीबाई फुले यांच्या प्रति असलेल्या कृतर्थ भावनेने त्यांच्या नावाने राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार ही भूमिका थोर इतिहास तज्ञ डॉक्टर श्रीमंत कोकाटे यांनी मांडली. जर कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून माजी आमदार मा.दत्तात्रय सावंत साहेब आय.आर.एस



मा. विपुल वाघमारे साहेब माननीय श्री गणेश माने देशमुख साहेब चेअरमन जय हिंद सहकारी साखर कारखाना मा.शिवाजी खांडेकर मा. रावसाहेब मिरगणे मा. सौ श्रीलेखा पाटील मॅडम उपस्थित होते. कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष मा.महेश आप्पा शिंदे व योगेश निंबाळकर उपस्थित होते.

महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील जवळपास ३० गुणवंत शिक्षकांना श्रीमंत छत्रपती संभाजीराजे महाराज यांच्या हस्ते शाल श्रीफळ प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. आपल्या मनोकातामध्ये श्रीमंत छत्रपती संभाजी राजे यांनी छत्रपती शाहू महाराज यांनी समाजासाठी सुरू केलेल्या विविध शाळा महाविद्यालय आश्रम शाळा यांची माहिती दिली तसेच पुढच्या पिढीला घडवायचे असेल तर शिक्षक हाच एकमेव पर्याय आहे हे त्यांनी कणखरपणे सांगितले व उपस्थित सर्व गुणवंत शिक्षकांना त्यांच्या भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.औदुंबर लोंढे यांनी केले सूत्रसंचालन प्राध्यापक सोमनाथ गोडसे यांनी केले सदर कार्यक्रमाचे संपूर्ण आयोजन महात्मा फुले इतिहास अकादमी, राष्ट्र सेवा समूह, रयत प्रकाशन, गिरी प्रेमी ग्रुप पुणे यांनी केले.

## मार्केट यार्ड येथील दुकानात चोरी करण्याचा प्रयत्न

सोलापूर (प्रतिनिधी) मार्केट यार्ड येथील फिर्यादी दीपक रमेशलाल थारवाणी (वय–४४,रा.नवजीवन नगर,सिव्हिल लाईन सोलापूर) यांचे ओम टेड्रर्स नावाच्या दुकानात अज्ञात चोरट्याने दुकानाच्या लोखंडी शटरची साईट पट्टी उचकटून चोरी करण्याचा प्रयत्न केला आहे.ही घटना १६ ते १७ जानेवारी दरम्यान घडली.याप्रकरणी दीपक थारवाणी यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून, त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस हवालदार सय्यद हे करीत आहेत.

# समाजाच्या सर्वांगीण प्रगती करिता मूल्य शिक्षणाची गरज : डॉ. पंडित विद्यासागर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे राष्ट्रीय सेवा योजना व कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय इंदापूर , कला ,विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय भिगवन आणि श्रीमती रत्नप्रभादेवी पाटील महाविद्यालय बावडा यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष व राज्याचे माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली बिजवडी ता. इंदापूर येथे विशेष हिवाळी श्रम संस्कार शिबिराचे दि. २४ जानेवारी ते ३० जानेवारी आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराचे उद्घाटन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडचे माजी कुलगुरू डॉ. पंडित विद्यासागर यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी बोलताना ते म्हणाले की,' समाजाच्या सर्वांगीण प्रगती करिता मूल्य शिक्षणाची गरज आहे. मूल्यशिक्षण व संस्कारातून देश घडविता येतो ,राष्ट्राची प्रगती साधता येते. राष्ट्रीय सेवा योजना हे मूल्य शिक्षण विद्यार्थ्यांना देण्याकरिता महत्त्वाची केंद्र ठरतात. युवकांनी शिबिर कालावधीतील मिळालेल्या ज्ञानाचा , अनुभवाचा आपल्या सर्वांगीण प्रगती करिता उपयोग करावा.

युथ फॉर डिजिटल भारत, युथ फॉर डिजिटल लिटरसी हा उद्देश घेऊन शिबिरात विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

संस्थेचे संचालक विलास वाघमोडे म्हणाले की,' विद्यार्थ्यांनी श्रमाला न लाजता श्रम करण्याचे वळण लावून घ्यावे. चांगले कार्य करून स्वतःचे व महाविद्यालयाचे नाव उज्वल करावे.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जीवन सरवदे यांनी प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली.विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की विद्यार्थ्यांना या निवासी शिबिरातून श्रमाचे महत्त्व तसेच विविध उपक्रमशील कौशल्य आत्मसात करता येतील.

यावेळी संस्थेचे संचालक तुकाराम जाधव, भिगवन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.महादेव वाळुंज, बावडा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लहू वावरे, इंदापूर महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. दत्तात्रय गोळे, कला शाखा विभाग प्रमुख डॉ. भिमाजी भोर, विज्ञान विभाग प्रमुख डॉ. शिवाजी वीर, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. सदाशिव उंबरदंड यावेळी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. उत्तम माने यांनी केले.प्रास्ताविकात त्यांनी शिबिर कालावधीतील घेतल्या जाणाऱ्या उपक्रमाविषयीची माहिती दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. रोहिदास भांगे यांनी केले. कार्यक्रमाचे आभार रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. अनिल बनसोडे यांनी आभार मानले.



रासेयो कार्यक्रमाधिकारी प्राध्यापिका मनीषा गायकवाड , प्रा. पुरुषोत्तम साठे, डॉ. तयाजी लोंढे, कनिष्ठ विभागाच्या रासेयो कार्यक्रमाधिकारी प्राध्यापिका सुवर्णा जाधव, प्रा. धन्यकुमार माने यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रयत्न केला.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई–मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे–३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### ॲम्बुलन्सची दुचाकीला धडक; ॲम्बुलन्स चालकावर गुन्हा

सोलापूर, (प्रतिनिधी) : ॲम्बुलन्सची दुचाकिला पाठीमागून धडक दिल्याने म्बुलन्स चालकविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना २२ जानेवारी रोजी रात्री खडक गल्ली बाळे येथे घडली.याप्रकरणी अशोक पांडुरंग आयवळे (वय-५६,रा.हौसे वस्ती,अमराई) यांनी फौजदार चवळी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून म्बुलन्स चालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. अधिक माहिती अशी की, फिर्यादी हे बार्शी ते सोलापूर कडे जाणाऱ्या रस्त्यावर त्यांची वरील क्रमांकाची दुचाकी घेऊन जात असताना वरील ठिकाणी ॲम्बुलन्स चालकाने त्याच्या ताब्यातील म्बुलन्स क्रमांक एमएच.१३. सीईओ.८८८२ हे वाहन निष्काळजीपणाने व भरधाव वेगात चालवून फिर्यादी यांना पाठीम ागून धडक देऊन न थांबता पळून गेला आहे. तसेच फिर्यादी यांच्या जखमी होण्यास व गंभीर दुखापत करण्यास कारणीभूत झाला आहे. असे फिर्यादीत म्हटले आहे. तपास पोलीस हवालदार कसबे हे करीत आहेत.

# राष्ट्रध्वजासाठी प्लॅस्टिकचा वापर करु नये : प्रांताधिकारी सचिन इथापे

## राष्ट्रध्वजाचा मान राखणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य असून योग्य तो मान राखला जावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : केंद्र शासनाच्या गृहमंत्रालयाने दिलेल्या निर्देशानुसार राष्ट्रध्वजाकरीता प्लॅस्टिकच्या वापरास तसेच प्लॅस्टिकचा राष्ट्रध्वज निर्मितीस व विक्रीस मान्यता नाही. राष्ट्रध्वजाचा मान राखणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य असून, राष्ट्रध्वजाचा योग्य तो मान राखला जावा तसेच त्याचा अवमान होऊ नये, यासाठी प्लॅस्टिकच्या राष्ट्रध्वजाचा वापर, निर्मिती व विक्री करू नये, असे आवाहन प्रांताधिकारी सचिन



इथापे यांनी केले आहे.

दरवर्षी प्रजासत्ताक दिन, महाराष्ट्र दिन, स्वातंत्र्य दिन, इतर राष्ट्रीय कार्यक्रम व महत्त्वाचे सांस्कृतिक कार्यक्रम व क्रीडा सामन्यांच्या वेळी विद्यार्थी व नागरिकांकडून राष्ट्रध्वजाचा वापर करण्यात येतो. हा कार्यक्रम पार पडल्यानंतर फाटलेले कागदी तसेच प्लॅस्टिकचे राष्ट्रध्वज मैदानात, रस्त्यावर तसेच कार्यक्रम ाच्या ठिकाणी इतस्तत: पडलेले असतात. असे राष्ट्रध्वज पायदळी तुडविले जातात. त्यामुळे राष्ट्रध्वजाचा अवमान होतो. राष्ट्रध्वजाचा अवम ान करणे त्याची विटंबना होणे हे बोधचिन्हे नावे (अनुचित वापरास प्रतिबंध) अधिनियम १९५० राष्ट्रीय प्रतिष्ठा अवमान प्रतिबंध अधिनियम १९७१ तसेच ध्वजसंहितेच्या तरतुदीनुसार दंडनीय अपराध आहे.

केंद्रीय गृह मंत्रालयाने दिलेल्या निर्देशानुसार राष्ट्रध्वजाकरिता प्लॅस्टिकच्या वापरास मान्यता नाही. राष्ट्रध्वजाचा योग्य तो मान राखला जावा. खराब झालेले, राष्ट्रध्वज आढळून आल्यास ते सन्मानपूर्वक गोळा करुन नजीकच्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यालयाम ध्ये जमा करावेत असे आवाहन प्रांताधिकारी इथापे यांनी केले आहे.



## श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरास एक लक्ष रुपयाची देणगी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीस इंदुमती रामचंद्र दळवी राहणार पुणे यांनी एक लक्ष रुपयांची देणगी दिल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली. त्याबद्दल देणगीदार यांचा मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे लेखाधिकारी मुकेश अनेचा यांनी श्री विठ्ठल रुक्मिणी मातेची प्रतिमा व उपरणे देऊन यथोचित सन्मान केला.

यावेळी देणगीदार यांचे कुटुंब व देणगी विभाग प्रमुख राजेश पेटले उपस्थित होते. संबंधित देणगीदार यांनी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीच्या अन्नछत्रासाठी देणगी देण्याची इच्छा मंदिर समितीच्या सदस्या ॲड. माधवी निगडे यांच्याकडे व्यक्त केली होती. त्या दर महिन्याला श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी येत असतात. जास्तीत जास्त भाविकांना अन्नदान व्हावे अशी त्यांची मनोमन इच्छा आहे. सदरची देणगी त्यांनी कै. लक्ष्मी शिवाजी दळवी व कै. राम चंद्र दगडोबा दळवी या आपल्या वडिलांच्या स्मरणार्थ दिली आहे.



## पालकमंत्र्यांनी कोठे परिवाराचे केले सांत्वन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : माजी महापौर महेश कोठे यांच्या निधनाबद्दल पालकमंत्री जयकुम ार गोरे यांनी गुरुवारी रात्री कोठे यांच्या मुरारजी पेठेतील राधाश्री निवासस्थानी जाऊन कोठे परिवाराचे सांत्वन केले.

यावेळी पालकमंत्री जयकुम ार गोरे यांनी दिवंगत माजी म हापौर महेश कोठे यांच्या प्रतिम ेस पुष्प वाहून श्रद्धांजली अर्पण केली. पालकमंत्री जयकुमार गोरे म्हणाले, अनेक दशकांचा प्रदीर्घ राजकीय अनुभव असलेले माजी महापौर महेश कोठे हे सोलापूरच्या राजकारणातील, समाजकारणातील लोकप्रिय नेतृत्व होते. त्यांच्या निधनाने राजकीय सामाजिक सांस्कृतिक क्षेत्रात निर्माण झालेली पोकळी भरून न निघणारी आहे. महेश कोठे यांच्या निधनामुळे कोठे परिवाराला मोठा धक्का बसला आहे. त्यामुळे आगामी काळात कोठे परिवाराच्या पाठीशी आपण भक्कमपणे उभे राहू, असेही पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी याप्रसंगी सांगितले. यावेळी त्यांनी आमदार देवेंद्र कोठे, डॉ. सूर्यप्रकाश कोठे, प्रथमेश कोठे आणि कोठे परिवाराशी चर्चा करून त्यांना धीर दिला.

या सांत्वनपर भेटीप्रसंगी माजी आमदार रामभाऊ सातपुते, आमदार देवेंद्र कोठे, डॉ.सूर्यप्रकाश कोठे, माजी नगरसेवक प्रथमेश कोठे,भाजपा जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार - पाटील, भाजपा शहराध्यक्ष नरेंद्र काळे, माजी नगरसेवक विनायक कोंड्याल, गुरुशांत धुत्तरगावकर, विठ्ठल कोटा, म ेघनाथ येमुल, कुमुद अंकाराम, शिवसेना जिल्हाप्रमुख अमोल शिंदे, युवराज सरवदे, अक्षय वाकसे, तुषार पवार, अक्षय अंजिखाने, परशुराम भिसे, मारुती नल्ला आदी उपस्थित होते.

# महात्मा फुले इतिहास अकादमीची राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार भैरवनाथ कानडे यांना प्रदान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस. के. गायकवाड : महात्मा फ ुले इतिहास अकादमी, राष्ट्र सेवा समूह, रयत प्रकाशन व गिरी प्रेमी ग्रुप, पुणे यांच्या वतीने शैक्षणिक व सामाजिक कार्याबददल देण्यात येणारा महात्मा फुले , सावित्रीबाई फ ुले राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार तुळजापूर तालुक्यातील चिकुद्रा येथील .श्री . भैरवनाथ माध्यमिक विद्यालयाचे सहशिक्षक भैरवनाथ खडू कानडे यांना माजी खासदार युवराज छत्रपती संभाजी महाराज यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला .

राज्यातील शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या गुणवंत शिक्षक आणि शाळांना देण्यात येणारा म हात्मा फुले, सावित्रीबाई फुले राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार वितरण सोहळा(दि २३ ) रोजी पुणे येथील एस . एम . जोशी सभागृहात पार पडला . याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून माजी शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत, पुणे विभाग शिक्षण निरीक्षक रावसाहेब मिरगणे, आयआरएस विपुल वाघमारे, श्रीराम शिक्षण



संस्थेच्या प्रमुख सौ. श्रीलेखा पाटील, शिक्षकेतर संघटनेचे नेते शिवाजीराव खांडेकर, जयहिंद साखर कारखान्याचे चेअरमन गणेश माने - देशम ुख, महात्मा फुले इतिहास अकादमीचे अध्यक्ष तथा जेष्ठ इतिहास अभ्यासक डॉ. श्रीमंत कोकाटे, महेशआप्पा शिंदे, योगेश निंबाळकर आदींची उपस्थिती होती. भैरवनाथ कानडे हे ज्ञानकिरण सामाजिक संस्थेचे अध्यक्ष तसेच जिल्हा मराठी भाषा समितीचे सदस्य व विविध समित्यांवर ते कार्यरत आहेत. त्यांनी आजतागायत शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, पत्रकारिता, साहित्य व निवेदन क्षेत्रात भरीव योगदान दिले असून यापूर्वी त्यांना महाराष्ट्र शासनाच्या राज्यस्तरीय क्रांतीज्योती सावित्रीम ाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कारासह विविध पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे .सदर पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे .

## जागेमध्ये प्रवेश करून दमदाटी; १४ जणांवर पुन्हा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (प्रतिनिधी) मालकी हक्काच्या जागेत प्रवेश करून दम दाटी केल्याप्रकरणी १४ जणांचा जणांविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना २६ सप्टेंबर २०२४ रोजी दुपारी म्हेत्रे नगर, कुमठा नाका) येथे घडली.या प्रकरणी सुगलाबाई मल्लिकार्जुन कुंभार (वय-७७,रा.कल्लाप्पा म्हेत्रे वस्ती,कुमठा नाका) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून नागेश शिवलिंगप्पा कोरे, प्रवीण नागेश कोरे, सुमित विजय मन्सावाले, विजय ठाकूरसिंग मन्सावाले, सुनिता विजय मन्सावाले, सुरेश जीवनसिंग गोरलेवाले, रणजीतसिंग मोहनसिंग तारवाले, छत्तसिंग गंगाराम हजेरीवाले, प्रमोद गायकवाड व यांच्यासह इतर चार ते पाच इसमाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, फिर्यादी यांचा असलेला प्लॉट तो फिर्यादी यांनी दुसऱ्याला विकला व त्याचा ताबा देण्यासाठी वरील ठिकाणी फिर्यादी गेले असता,नागेश कोरे व प्रवीण कोरे हे देखील त्या ठिकाणी येऊन फिर्यादी यांना तुम्ही कोणीही येथे यायचे नाही.येथे काही केले किंवा आला तर याद राखा असे म्हणाले. तसेच तुम्हाला जे काही सांगायचे असेल तर प्रमोद गायकवाड याला सांगा त्यांच्या ऑफिसमध्ये जाऊन भेटा असे म्हणून वरील संशयित आरोपी यांनी फिर्यादी यांच्या मालकीच्या जागेमध्ये प्रवेश करून दमदाटी केली आहे. असे फिर्यादीत नमूद आहे. तपास स. पो.नि. चंदनशिवे हे करीत आहेत.

## आवेसी मलबारी, उबैद शाह यांची राष्ट्रीय टेनिस क्रिकेट स्पर्धेसाठी निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : टेनिस क्रिकेट सोसिएशन महाराष्ट्र व नाशिक जिल्हा टेनिस क्रिकेट असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमानाने पाचवी सब ज्युनिअर टेनिस क्रिकेट चॅम्पियनशिप स्पर्धा मीनाताई ठाकरे स्टेडियम नाशिक येथे पार पडल्या यात कु. आवेस समीर मलबारी व कु. उबैद रमजान शाह या दोन मुलांची राष्ट्रीय टेनिस क्रिकेट स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल त्यांचे राज्यातून सर्वत्र अभिनंदन होत आहे. नियाज नॅशनल स्कूल, तालुका भिवंडी, जिल्हा ठाणे येथे इयत्ता नववी मध्ये शिकत आहेत. त्यांच्या निवडीबद्दल भारतीय टेनिस क्रिकेट







असोसिएशनच्या सचिव म ीनाक्षी गिरी, नियाज नॅशनल स्कूलच्या ट्रस्टी फर्जिन चौधरी, नियाज नॅशनल स्कूलचे क्रीडा शिक्षक व मुंबई झोन डायरेक्टर कु. महेश अनिल मिश्रा व शाळेच्या मुख्याध्यापकांनी, शिक्षकांनी व पालकांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस खूप खूप शुभेच्छा दिल्या.

### नगरपंचायतीने केले विविध विक्रेत्यांकडून १६ किलो प्लास्टिक जप्त

# निफाड नगरपंचायतच्या वतीने शहरात प्लास्टिक जप्तीची कारवाई



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : स्वच्छ सर्वेक्षण २०२४/ २५ व माझे वसुंधरा ५० अंतर्गत व एकल वापर प्लास्टिक बंदी अंमलबजावणी मोहिमे अंतर्गत नुकतेच निफाड शहरात प्लास्टिक जप्तीची कारवाई करण्यात आली यात निफाड नगरपंचायतीने १६ किलो प्लास्टिक विविध विक्रेत्यांकडून जप्त केले. ही मोहीम नियमितपणे सुरू राहणार असून प्लास्टिक वितरण व वितरक दुकानदारांवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असे निफाड नगरपंचायतीचे मुख्याधिकारी अमोल चौधरी यांनी सांगितले आहे.

एकल वापर प्लास्टिक बंदीच्या अनुषंगाने केंद्रीय व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून एकल वापर प्लास्टिक बंदी अंमलबजावणी बाबत कळविण्यात आले असून निफाड शहरातील आठवडे बाजार शुक्रवारी तसेच नियमितपणे ही मोहीम राबविली जाणार असून नगरपंचायतीने याबाबत सक्त सूचना दिल्या आहेत. शहरातील विक्रेते, फुल विक्रेते, स्थानिक बाजारपेठेत भाजीपाला दुकाने या ठिकाणी एकल वापर प्लास्टिक जप्ती व बंदी करण्याची मोहीम राबवली जाणार आहे असे निफाड नगरपंचायत च्या वतीने निवेदनाद्वारे कळविले आहे.



## सैनिक टाकळी ग्रामपंचायत कार्यालयामध्ये शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि स्वातंत्र्य सैनिक सुभाषचंद्र बोस यांची जयंती साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सैनिक टाकळी प्रतिनिधी / संजय चव्हाण :

सैनिक टाकळी येथील ग्रामपंचायत कार्यालयामध्ये शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि स्वातंत्र्य सैनिक सुभाषचंद्र बोस यांची जयंती एकत्रितपणे साजरी करण्यात आली .यावेळी शिवसेनेचे शिरोळ तालुका संघटक संभाजी गोते यांनी आपल्या मनोगतात बाळासाहेब ठाकरे यांनी मराठी भाषिकांच्यावर होत्याल्या अन्यायाविरुद्ध आवाज उठवला मुंबईत नव्हे तर आख्या महाराष्ट्रातच कोणत्याही घटकावर अन्याय होऊन दिला नाही तसेच महाराष्ट्र कर्नाटक सीमा वादावर अत्यंत महत्त्वाची भूमिका घेतली होती .अशा अनेक ठिकाणी होत असलेल्या अन्यायाविरुद्ध त्यांनी आवाज उठवला त्यांनी आम्हाला ८० टक्के समाजकारण आणि जमलं तर २० टक्के राजकारण करा असा धडा शिकवला आपल्या राजकीय कारकीर्दीत कुठलाही स्वार्थ बाळगला नाही त्याचबरोबर देशाचे दुसरे नेते आझाद हिंद सेनेचे संस्थापक महान स्वातंत्र्य सैनिक देशाचे प्रखर राष्ट्रभक्त सुभाषचंद्र बोस यांनीही या देशासाठी एक स्वातंत्रपणे लढा दिला असे या दोन्ही लढवाया थोर पुरुषांचा आज सैनिक टाकळी येथे म ोठ्या उत्साहात जयंती साजरी होत आहे .याचा मला सार्थ अभिमान आहे, असे म्हणाले.

यावेळी शिवसेना शाखाप्रमुख महेश पाटील उपशाखाप्रमुख संभाजी गायकवाड युवा सेना शाखाप्रमुख अमित खराडे हनमंत पाटील, संदीप पाटील, रंणजीत सुतार, कृषी सहाय्यक अधिकारी गौरव राणे ग्रामपंचायत कर्मचारी सचिन वणकोरे महादेव पाटील, संजय पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

## थोडक्यात...

### चारित्र्याच्या संशयावरून पत्नीचा छळ; पतीसह सात जणांवर गुन्हा

सोलापूर, (प्रतिनिधी) : पत्नी सासरी नांदत असताना सासरकडच्या मंडळींनी संगणमत करून फिर्यादी मेघा नितीन मंताटी (वय-२२,रा.विट्ठा नगर,विडी घरकुल) यांना नांदविण्यास तयार नसल्याने फिर्यादी मेघा यांनी समाजातील प्रतिष्ठित लोकांना घेऊन बैठक घेतली असता, त्यावेळी वरील संशयित आरोपी यांनी चारित्र्यावर संशय घेऊन फिर्यादीस नांदविण्यास नकार दिला. तसेच घटस्फोट देणार आहे असे. म्हणत जे काही आहे ते कोर्टात बघू, आम्हाला येथे काही एक बोलायचे नाही असे म्हणून बैठकीतून निघून गेले. असे फिर्यादीत नमूद आहे. याप्रकरणी मेघा मंताटी यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून, त्यांच्या फिर्यादीवरून पती नितीन मंताटी, सासरे श्रीनिवास मंताटी,सासू रंजनी मंताटी, सागर मंताटी, अक्षय मंताटी, भारताबाई मंताटी व अंबादास म्हंता (सर्व. रा.सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.ही घटना २८ जानेवारी २०२३ ते २२ सप्टेंबर २०२४ दरम्यान फिर्यादी यांच्या सासरी घडली. या घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार कटके हे करित आहे.

# स्वेरीज कॉलेज ऑफ फार्मसीच्या 'विशेष श्रमसंस्कार शिबिरा'चे अनवली येथे उद्‌घाटन

## राष्ट्रीय सेवा योजनेच्या 'विशेष श्रमसंस्कार शिबिरा'चे सरपंच वल्लभ घोडके यांच्या हस्ते संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर व गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ फार्मसी च्या वतीने अनवली (ता. पंढरपूर) मध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबिराचे नुकतेच उद्‌घाटन करण्यात आले.

प्रारंभी राष्ट्रसंत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन सरपंच वल्लभ घोडके यांच्या हस्ते करून या राष्ट्रीय सेवा योजनेच्या 'विशेष श्रमसंस्कार शिबिरा'चे उदघाटन करण्यात आले. स्वेरीचे संस्थापक सचिव डॉ.बी. पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली या 'विशेष श्रमसंस्कार शिबिरा'चे आयोजन करण्यात आले आहे.



पोलीस पाटील तौफिक शेख हे स्वेरीज् कॉलेज ऑफ फार्मसीच्या स्वयंसेवकांचे कौतुक करताना म्हणाले की, 'स्वेरीचे शैक्षणिक उपक्रम नेहमीच चांगले असतात. मागच्या वर्षी प्रमाणे या ही वर्षी स्वयंसेवकांना अनवली ग्रामस्थ मंडळींकडून यथोचित सहकार्य मिळण्याची ग्वाही मी देतो.'असे सांगून स्वेरीच्या उपक्रमांचे स्वागत केले. उपसरपंच संदीप डिसले यांनी शिबिरासाठी शुभेच्छा दिल्या.

राष्ट्रीय सेवा योजनेचे पंढरपूर विभागीय समन्वयक डॉ. संजय मूजमुले यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्व सांगून स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. तब्बल आठवडाभर चालणाऱ्या या उपक्रमात ग्रामस्वच्छ्ता अभियान, श्रमदान, 'महिलांचे आरोग्य व आहार'या विषयावर पंढरपूर पंचक्रोशीत अल्पावधीतच प्रसिद्ध झालेल्या डॉ. बी.पी. रोंगे हॉस्पिटल तर्फे स्त्रीरोग व प्रसुतिशास्त्र तज्ञ डॉ.स्नेहा रोंगे यांचे व्याख्यान, वृक्ष लागवड, वत्सल नेत्रालय पंढरपूर येथील डॉ. राखी मणियार यांच्या उपस्थितीत डोळे तपासणी शिबिर, पंढरपूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक टी. वाय. मुजावर यांचे नवीन कायदे व डिजिटल फ्रौड या बाबत मार्गदर्शन, 'डिजिटल साक्षरतेसाठी युवक' या सारख्या सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. आठवडाभर चालणाऱ्या या शिबिरात राष्ट्रीय सेवा योजनेच्या सुमारे ५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आहे. यावेळी माजी सरपंच गजेंद्र शिंदे, महाराष्ट्र शासनाचा'आदर्श पोलीस पाटील'पुरस्कार विजेते तौफिक शेख, तलाठी नवनाथ मरे, सचिन शिंदे, विद्यार्थी प्रतिनिधी मयूर फंड, विद्यार्थिनी प्रतिनिधी प्राची शिंदे, रा.से.यो.चे सर्व स्वयंसेवक आणि अनवली येथील ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.हेमंत बनसोडे यांनी सुत्रसंचालन करून आभार मानले.

**कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. मिथुन मणियार यांनी दि.२३ जानेवारी पासून ते दि. २९ जानेवारी २०२५ पर्यंत आठवडाभर चालणाऱ्या या 'राष्ट्रीय सेवा योजने'च्या शिबिराची संपूर्ण रूपरेषा व यासंबंधी सविस्तर माहिती दिली.**

# श्री क्षेत्र कानिफनाथ गडावर विविध विकास कामांचा भूमिपूजन समारंभ संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर प्रतिनिधी/डॉ. विनायक गायकवाड :

श्री क्षेत्र कानिफनाथ गडावर पालखी मार्गावर पेव्हिंग ब्लॉक बसविणे, मंदिर वाहनतळ परिसरात पेव्हिंग ब्लॉक बसविणे, मंदिर परिसर सुधारणा करणे, प्रदक्षिणा मार्ग रस्ता कॉँक्रिटीकरण करणे, जिल्हा नियोजन फंडातून कानिफनाथ गड मुख्य रस्ता करणे (गोरख फडतरे ते बाळासाहेब पवार घर रस्ता) इत्यादी विकासकामांचे भूमिपूजन विजय शिवतारे (माजी मंत्री. आमदार : पुरंदर - हवेली ) यांच्या हस्ते झाले. आमदार विजय शिवतारे यांनी यावेळी सांगितले कि



सध्या तरुण पिढी व्यसनधितेकडे वळलेली दिसत आहे. व्यसनामुळे अनेक अपघात होत आहे. आयुष्याची राखरांगोळी होते, यासाठी उपाय तरुणांनी अध्यात्मकडे वळावे असे आव्हान या वेळी केले. भूमिपूजन कार्यक्रम प्रसंगी

जि.प. सदस्य श्री. दिलीप आबा यादव, पुणे मा. नगरसेवक श्री. महेश जगताप, उपसभापती श्री. दत्ताशेठ काळे, श्री. राजुशेठ झेंडे, श्री. विशाल रावडे, श्री. अनिल ढवळे, श्री. मनोज वाडकर, श्री. अमोल भोराडे, श्री. म्हस्कू कटके, श्री. दादासाहेब जगदाळे (शाखाप्रमुख बोपगाव), श्री. नंदकुमार फडतरे, श्री. तुळशिराम गोफणे, श्री. बाळासाहेब फडतरे, श्री. दिपक बबन फडतरे, श्री. बाळासो बबन फडतरे, श्री. पांडुरंग फडतरे, श्री. तुकाराम जगदाळे, श्री. विनायक गायकवाड (पोलीस पाटील ) श्री. ह भ प बाळूतात्या फडतरे, श्री. उत्तम फडतरे, श्री. समाधान भोसले, श्री. कुंडलिक फडतरे, श्री. पांडुरंग बाठे, श्री. संतोष गोफणे, श्री. साहेबराव फडतरे, श्री. राजेंद्र फडतरे, श्री. अमित जगदाळे, विद्यमान सरपंच सौ ज्योती फडतरे, माजी सरपंच सौ स्वाती फडतरे, ग्रामसेविका सौ राखी ढ गारे, ठेकेदार श्री. आशिष निगडे, देवस्थान अध्यक्ष श्री. माऊली फडतरे, उपाध्यक्ष श्री. दीपक फडतरे, सचिव श्री. जयवंत फडतरे, खजिनदार श्री. नागेश फडतरे, संचालक श्री. सुरेश फडतरे, श्री. नितीन फडतरे, श्री. महादेव फडतरे, श्री. प्रकाशभाऊ फडतरे आदी मान्यवर उपस्थित होते.



# धाराशिव वकील संघाच्या वतीने डॉ. राकेश जानराव यांना अर्थशास्त्रात पीएचडी मिळाल्याबद्दल सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

धाराशिव : सुधाकर रणदिवे, जिल्ह्या वि विधीज्ञ मंडळ व वकील मित्र परिवार यांचे वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर ची अर्थशास्त्र विषयात पीएचडी मिळाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष ड, गणपती कांबळे (जिल्हा अध्यक्ष चर्मकार संघ धाराशिव) हे होते, यावेळी ड. कांबळे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळात कार्यरत असताना अर्थशास्त्रात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर ची पदवी मिळवली ही कौतुकास्पद अशी बाब आहे. ही उल्लेखनीय अशीच कामगिरी आहे.ही आम्हाला अभिमानास्पद असून सदर बाब इतर कर्मचारी आणि तरूणांना प्रेरणा देणारी आहे. प्रस्ताविक ॲड. परमेश्वर सुकाळे,यांनी केले तर आभार ॲड. धर्मराज सोनवणे, यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ॲड, सुकाळे, ॲड.बाळासाहेब पवार, ॲड, सतिश राठोड, ॲड, महेन्द्र सोनवणे, ॲड, सुदर्शन डोबाळे, ॲड, साबीर शेख, ॲड, पठाण, ॲड, राजुदास आडे, ॲड, आसिफ शेख, ॲड, बाकळे, ॲड,अमोल डोंगरे, व इतर सर्व विधीज्ञ यांनी सत्कार केला.

# सुपतगाव शाळेत हळदी कुंकू कार्यक्रम उत्साहात



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उमरगा/प्रतिनिधी : सुपतगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये पालक-शिक्षक यांच्यातील संबंध दृढ होण्यासाठी गुरुवारी (ता. २३) आयोजित केलेला महिला मेळावा विविध उपक्रमांनी उत्साहात पार पडला. मकरसंक्रांतीनिमित्त महिला पालकांकरिता हळदीकुंकू व तिळगुळ वाटपाचा कार्यक्रम घेण्यात आला.


कार्यक्रमाच्या प्रारंभी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या वेळी मुख्याध्यापक गणपती कबाडे, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य,दैवशाला घोडके, अंजली गुरव,प्रगती मुळे, अर्चना हेंडले,अनिता बिराजदार, श्रीदेवी बिराजदार, संध्या लामजने, सुनंदा शिंदे,अनुश्री हेंडले ,सुनीता कांबळे , रंजना लोहार, उपस्थित होत्या. या वेळी महिलांसाठी विविध खेळ घेण्यात आले. काही महिलांनी उखाणे घेतले. याप्रसंगी हळदी कुंकू देऊन वाण देण्यात आले. शाळेतील शिक्षिका जयश्री दलाल , पांचाळ , लक्ष्मी लामजणे आदींनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

# महामंडळाच्या सर्व बसस्थानकांमध्ये तृतीयपंथीयांना राखीव स्वच्छतागृह उपलब्ध करून द्यावे : परिवहन राज्यमंत्री माधुरी मिसाळ

## बसचे अपघात कमी करण्यासोबतच बस स्थानकातील स्वच्छतेला प्राधान्य देण्याचे निर्देश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील परिवहन महामंडळाच्या बसेसचे होणारे अपघात कमी करण्यासंदर्भात ठोस पावले उचलण्यात यावीत. राज्यातील सर्व बस स्थानकांवर तृतीयपंथीयांना राखीव स्वच्छतागृह उपलब्ध करून द्यावे. तसेच बस स्थानक परिसर स्वच्छ व उत्तम सोयी सुविधायुक्त ठेवण्यात यावा, असे निर्देश परिवहन राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी दिले.



एसटी महामंडळाच्या आढावा बैठकीचे आयोजन राज्यमंत्री श्रीमती मिसाळ यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. बैठकीला परिवहन महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ.माधव कुसेकर, वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी गिरीश देशमुख, महाव्यवस्थापक नंदकुमार कोळकर व अन्य अधिकारी उपस्थित होते.

राज्यमंत्री श्रीमती मिसाळ यांनी महामंडळाच्या बसचे होणारे अपघात कमी करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत सूचना देत प्रवाशांसाठी आवश्यक त्या सोयी-सुविधा आणि बसचे वाहक व चालक यांच्या मुक्कामी असणाऱ्या ठिकाणी सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत सूचना दिल्या.

यासोबतच निवासस्थान प्रकल्प लवकरात लवकर मार्गी लावण्याच्या सूचनाही दिल्या. बसस्थानक व लोकांना उत्तम सुविधा व सुरक्षित प्रवासासाठी आगामी काळात विविध उपाययोजना राबविण्यात येणार असल्याचेही राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी सांगितले.

**समाजसेवेचा वसा घेतलेल्या माणसाचा सन्मान**

**कैलाश आंधळे यांचे प्रतिपादन**

# दादाभाऊ केदारे यांना २०२५ सालाचा 'मंत्रालयवार्ता'चा समाजभूषण पुरस्कार जाहिर

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : नाशिक जिल्ह्यातील आंबेडकरी चळवळीतील व ग्राहक जनजागृती अभियान चळवळीतील सामाजिक कार्यकर्ते व ग्राहक (उपभोक्ता) संरक्षण समिती चे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष श्री.दादाभाऊ केदारे यांच्या सामाजिक, धार्मिक , सांस्कृतिक ,राजकीय क्षेत्रातील केलेल्या कार्याची दखल घेत मंत्रालय वार्ताचे संपादक अनिल आहिरे साहेब व निवड समितीच्या अध्यक्षा व महाराष्ट्राच्या सुप्रसिद्ध गायीका सौ.निशा भगत यांनी मंत्रालया वार्ताच्या सन.२०२५ चा समाजभूषण पुरस्कारासाठी निवड करुन निवड पत्र पाठवण्यात आले असून या निवडीने पुर्ण महाराष्ट्रातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. सदर पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी राष्ट्रवादी कॉँग्रेस शरद पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार व महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे साहेब त्याचप्रमाणे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट साहेब व नामदार नरहरी जिरवाळ साहेब अन्न व औषधे मंत्री व खासदार आमदार यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात येणार आहे.पुरस्कार वितरण सोहळा बुधवार दिनांक २९जानेवारी २०२५ वेळ १२.०० वाजता ठिकाण केसी गांधी विद्यालय ऑडीरोरियम आर पी.रोड डी.मार्ट समोर हॉटेल जय मल्हार शेजारी बैल बाजार कल्याण पश्चिम या ठिकाणी संपन्न होणार आहे. या निवडील बदल डॉ.अविनाश झोटिंग राष्ट्रीय सचिव.सौ. रोहिणी जाधव राष्ट्रीय उपाध्यक्ष. डॉ.साहेबराव निकम,





डॉ.अर्चना झोटिंग राष्ट्रीय कार्याध्यक्ष. श्री.सचिन पवार राष्ट्रीय संघटक. सौ. जान्हवी पाटील राष्ट्रीय सदस्य श्री.महादेव मस्के राज्य अध्यक्ष. श्री.योगेश निकम राज्य संपर्क प्रमुख. श्री.शिवलाल पगार उत्तर महाराष्ट्र कार्याध्यक्ष. सौ.नम्रता कायस्थ.श्री.प्रकाश बोराडे नाशिक जिल्हाध्यक्ष व महाराष्ट्रातील सर्व पदाधिकाऱ्यांनी तसेच विदर्भ प्रसिद्धीप्रमुख डॉ.गंगाराम उबाळे व विदर्भ कार्याध्यक्ष सुनिल अंभोरे यांच्यासह बुलढाणा जिल्ह्यातील सर्व पदाधिकाऱ्यांच्या वतीने अभिनंदन केले आहे. तसेच समाज भूषण हा पुरस्कार जाहीर होताच विविध स्तरातून त्यांच्यावर कौतुकाचा व अभिनंदन याचा वर्षाव होत आहे.

# टाकळीवाडीत विकास कामे जोरात; गावकऱ्यांकडून समाधान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधी : टाकळीवाडी तालुका शिरोळ माळरानावरती वसलेलं छोटसं गाव व कमी लोकसंख्येचे गाव असून या गावचा विकास सध्या फार मोठ्या प्रमाणात होत आहे. गेल्या २० वर्षात गावच्या विकास कामाची प्रगती झाली नव्हती त्याच्या १० पटीने प्रगती होत आहे.

गावातील संपूर्ण गटारीचे काम पूर्णत्वास जात आहे. अनेक ठिकाणचे रस्ते, सार्वजनिक शौचालय, माजी सैनिकांसाठी सांस्कृतिक भवन, सार्वजनिक शौचालयासाठी पाण्याची सुविधा, मातंग,चर्मकार, बौद्ध समाजामध्ये विविध कामे अतिशय जोमाने चालू आहे.

मातंग समाजासाठी सांस्कृतिक हॉल मंजूर केलेला आहे. विठ्ठल बिरदेव मंदिरासाठी हॉल मंजूर केलेला आहे. श्री विठ्ठल मंदिराचे बांधकाम पूर्णत्वास गेले आहे.

म्हसोबा देवस्थानचे शिखराचे काम सुरू आहे. अनेक विकास कामे रखडलेली होती. ती पूर्णत्वास जात आहेत.

आतापर्यंत १० ते १२ कोटीची कामे पूर्णत्वास गेलेले आहेत. अजून २ कोटीचे काम गावामध्ये होणार आहेत.

आमदार राजेंद्र पाटील यड्रावकर, जिल्हा परिषद ,ग्राम पंचायत, यांच्या माध्यमातून विकास कामांचा डोंगर उभा राहत आहे. गावकऱ्यांच्या कडून कौतुक होत आहे.